लोकमत



कोल्हापुरात ताराराणी वसतिगृहाच्या नव्या इमारतीचे उद्घाटन शाहू छत्रपती, चंद्रकांत पाटील, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले.

# ताराराणी विद्यार्थिनी वसतिगृहाद्वारे १०० मुलींच्या शिक्षणाला बळ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** सुमारे साडेतीन कोटी रुपये खर्च करून तीनमजली, ३३ खोल्या असणारी वसतिगृहाची अद्ययावत नवी इमारत ताराराणी विद्यापीठाने साकारली आहे. या इमारतीचे उद्घाटन शाहू छत्रपती आणि माजी मंत्री चंद्रकांत पाटील, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. या ताराराणी विद्यार्थिनी वसतिगृहाद्वारे शंभर मुलींच्या शिक्षणाला बळ मिळणार आहे.

ताराराणी विद्यापीठाच्या आवारात या वसतिगृहाची नवी इमारत उभारली आहे. तिच्या उद्घाटनानंतर डॉ. व्ही. टी. पाटील स्मृती भवनात सत्काराचा कार्यक्रम झाला. ऑलिम्पिक (२०२१) मध्ये विविध क्रीडा प्रकारात देशाचे प्रतिनिधित्व केलेल्या नेमबाज तेजस्विनी सावंत, राही सरनोबत, स्वरूप उन्हाळकर यांच्यातर्फे त्यांच्या कुटुंबीयांनी प्रमुख उपस्थितांच्या हस्ते सत्कार स्वीकारला. भाजपचे महानगर जिल्हाध्यक्ष राहुल चिकोडे, इंजिनिअर प्रवीण पाटील, प्रणव कुलकर्णी, मनोहर निकम, ठेकेदार संतोष पाटील, धीरज दळवी यांचा सत्कार झाला.

यावेळी ताराराणी विद्यापीठाचे उपाध्यक्ष अशोक पर्वते, ॲड. पी. एम. हिलगे, डॉ. एस. एन. पवार, माजी आमदार भगवानराव साळुंखे आदी उपस्थित होते. कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी प्रास्ताविक केले. सचिव प्राजक्त पाटील यांनी आभार मानले. सोनल चव्हाण, सुजय पाटील यांनी सूत्रसंचालन केले. उषाराजे हायस्कूलच्या विद्यार्थिनींनी गौरवगीत सादर केले.

17 OCT 2021

जनसंपर्क कक्ष

लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कौशल्य विकासासाठी पुढाकार घ्या

## डी. टी. शिर्के यांचे आवाहन : प्राचार्य, समन्वयकांसमवेत चर्चा

लोकमत न्यूज नेटवर्क,

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातर्फे सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी सुरू होणाऱ्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राच्या गुणवत्तापूर्ण यशस्वीतेसाठी या भागातील महाविद्यालयांनी पुढाकार घेऊन योगदान द्यावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

या केंद्राच्या प्रवेश प्रक्रियेबाबत चंदगड येथील र. भा. माडखोलकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात सीमाभागातील महाविद्यालयांचे प्राचार्य, अग्रणी महाविद्यालय योजनेचे समन्वयक व कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रांच्या समन्वयकांची संयुक्त बैठक झाली. त्यामध्ये डॉ. शिर्के बोलत होते. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. ए. एम. गुरव, गडहिंग्लज क्लस्टरमधील सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, समन्वयक उपस्थित होते. विद्यापीठाच्या या उपक्रमाला सर्व महाविद्यालयांनी सहकार्य करावे, असे डॉ. नांदवडेकर यांनी सांगितले. कला व वाणिज्य महाविद्यालयात इनोव्हेशन सेंटर सुरू होण्यासाठी विद्यापीठाने मार्गदर्शन करून केंद्र सुरू करण्यासाठी सहकार्य करण्याची मागणी नेसरी महाविद्यालाचे प्राचार्य डॉ. भांबर यांनी केली. साधनाच्या प्राचार्या डॉ. अनिता पोवार यांनी बचत गटांसाठी विशेष प्रशिक्षण सुरू करण्याची मागणी केली. अतुल एतावडेकर, आर. एम. जाधव उपस्थित होते. महेश चव्हाण यांनी आभार मानले.

### प्रशिक्षण उपलब्ध व्हावे

टुरिझम अभ्यासक्रम सीमाभागातील गरजूंना देऊन पर्यटन विकासाला चालना देण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. येथील विद्यार्थी सक्षमपणाने उभा राहण्यासाठी त्याला विविध कौशल्यांचे गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण याच भागात व कमी खर्चात उपलब्ध व्हावे, असे डॉ. शिर्के यांनी सांगितले.

17 OCT 2021
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विकासात 'अध्ययन' महत्त्वाचे

## डॉ. एन. जे. पवार; 'हवामान बदल व शाश्वत विकास' व्याख्यान


डॉ.एन.जे.पवार

कोल्हापूर, ता. १६ : विविध समाजघटकांना आपत्तींशी मुकाबला करण्याबाबतचे योग्य मार्गदर्शन करण्याची जबाबदारी विद्यापीठीय व्यवस्थेने उचलण्याची गरज आज निर्माण झाली आहे. त्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठाचे हवामान बदल आणि शाश्वत विकास अध्ययन केंद्र महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास पुण्याच्या डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरू व शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एन.जे. पवार यांनी काल येथे व्यक्त केला. विद्यापीठाच्या सेंटर फॉर क्लायमॅट चेंज अँड सस्टेनेबल स्टडीज् यांच्या वतीने 'हवामान बदल व शाश्वत विकास' या ऑनलाईन व्याख्यानमालेत डॉ. पवार बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के होते.

डॉ. पवार म्हणाले, ''महापूर, भूकंप, वादळ आदी अंदाज वर्तवण्यायोग्य संकटांच्या बाबतीत हवामान तसेच पर्यावरणीय बदल मोठे चिंताजनक स्वरूपाचे आहेत. त्यामुळे त्यांच्याद्वारे निर्माण होणाऱ्या आपत्तींमध्ये झालेली वाढही चिंतेची आहे. या सर्व बदलांचा शास्त्रीय अभ्यास करण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे पाणी, हवा आणि माती यांचे उपयोजन आपण किती योग्य पद्धतीने करणार आहोत, यावरही अनेक गोष्टी अवलंबून आहेत. जगाच्या पाठीवरील १ टक्क्यापेक्षाही कमी पाणी मनुष्य व प्राणीमात्राच्या उपयोगाचे आहे. औद्योगिकीकरण आणि प्रदूषणामुळे हवेची गुणवत्ताही प्रचंड खालावलेली आहे. वनस्पतींचे आयुर्मान व भूजन्य संसाधनांचेही मोठ्या प्रमाणात अवमूल्यन व ऱ्हास झाला आहे.''

डॉ. सचिन पन्हाळकर यांनी स्वागत केले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत उपस्थित होते.

### उपक्रम कौतुकास्पद

पश्चिम महाराष्ट्राच्या विभागात पिण्याच्या पाण्यासह कृषी, सिंचन आणि उद्योगासाठी लागणाऱ्या पाण्याची मागणी कशी कमी करता येईल, त्याचे योग्य नियोजन कसे करता येईल, या दृष्टीने विचार करण्याचीही गरज आहे. समाजातील या प्रश्नांची उत्तरे विद्यापीठाने दिली पाहिजेत. त्या दृष्टिकोनातून सुरू झालेला हा उपक्रम कौतुकास्पद आहे, असे डॉ. पवार म्हणाले.

